



ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : १५ वे । अंक : तिसरा
जुलै ते सप्टेंबर : २०२४

## मराठवाड्यातील साहित्य विशेषांक

Scanned with CamScanner




**UGC Care Listed Journal**

ISSN 2231-573X

साहित्य, कला आणि
लोकसंस्कृतीला वाहिलेले

त्रैमासिक

# तिफण

मराठवाड्यातील साहित्य
विशेषांक । भाग - १

**वर्ष :** १५ वे, **अंक :** तिसरा
जुले ते सप्टेंबर : २०२४

संपादक : **डॉ. शिवाजी हुसे**
अतिथी संपादक : **प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ,**
**डॉ. दिलीप भिसे**

■ **संपादक मंडळ**
डॉ. सर्जेराव जिगे, डॉ. दिलीप बिरुटे,
डॉ. ताहेर पठाण, डॉ. रामचंद्र झाडे,
डॉ. सुभाष बागल, डॉ. दत्तात्रय डुंबरे,
डॉ. सुभाष शेकडे, डॉ. सुखदेव इघारे,
डॉ. प्रेमला मुखेडकर, डॉ. राजकुमार मुसणे,
डॉ. रंजना कदम, डॉ. यशवंत सोनुने

■ **मुद्रक**
रुद्रायणी, छत्रपती संभाजीनगर.

■ **मुखपृष्ठ, मांडणी व सजावट**
मंदार नागरे, छत्रपती संभाजीनगर
मो. ९४०४६११५९६

■ **वर्गणी**
वार्षिक सहयोग मूल्य : रु. ५००/-

■ **वर्गणी अशीही भरता येईल-**
संपादक, 'तिफण', बँक ऑफ महाराष्ट्र
शाखा : कन्नड, खाते क्र. 60287405377
आय.एफ.एस.सी. कोड क्र. MAHB0000259

■ **स्वागत मूल्य : २५०/- रुपये**

■ **संपादन :** अवैतनिक

■ **साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता**
डॉ. शिवाजी हुसे, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा
रोड, कन्नड- ४३१ १०३,
जि. छत्रपती संभाजीनगर. मो. ९४०४०००३९८
मेल : tifanprakashan2024@gmail.com

(या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.


Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| मराठवाड्यातील मध्ययुगीन साहित्य | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | शोधनिबंध शीर्षक | संशोधक/मार्गदर्शक | पृष्ठ क्र. |
| १ | आद्यकवी मुकुंदराज | डॉ. रश्मी शेट्ये - तुपे | ०९ |
| २ | मराठवाड्यातील संत परंपरा | प्रा. मोहन बाबुराव चव्हाण | १५ |
| ३ | आद्यकवी मुकुंदराज यांची वाङ्मयसंपदा | प्रा. सागर अशोक पाटील | २३ |
| ४ | मराठवाड्यातील संत परंपरा | डॉ.देविदास मल्हारी शेटे | २८ |
| ५ | संत जनाबाई, संत मुक्ताबाई व संत बहिणाबाईंचे वाङ्मयीन कार्य | प्रा.डॉ.जगताप यु.एस. | ३३ |
| ६ | मराठवाड्यातील वारकरी संत परंपरा | अतुल तुकाराम झंजाड | ३७ |
| ७ | मराठवाड्यातील संत परंपरा | डॉ.योगेश शेळके | ४३ |
| ८ | संत एकनाथांच्या काव्याचे सामाजिक, वाङमयीन विशेष | नेत्रा रवींद्र उपाध्ये, संशोधक विद्यार्थी<br>प्रा. डॉ. म. सु. पगारे, मार्गदर्शक | ४९ |
| ९ | मराठवाड्यातील संत कवयित्री | डॉ. म. ई. तंगावार | ५७ |
| १० | मराठवाड्यातील संतांचे लोकजीवनातील योगदान | प्रा. डॉ. गीतांजली वाल्मिकराव चिने | ६२ |
| ११ | मराठवाड्यातील संत परंपरा | डॉ. संदीप विठ्ठलराव सांगळे | ७० |
| १२ | मराठवाड्यातील स्त्री संत जनाबाई | डॉ. सुवर्णा खोडदे | ७७ |
| १३ | मराठवाड्यातील संतपरंपरा | डॉ. मीना चंद्रभान साळे | ८३ |
| १४ | मध्ययुगीन मराठी साहित्यात संत कवयित्री महदंबा यांचे योगदान | प्रा. डॉ. बब्रुवान मोरे | ८८ |
| १५ | मराठवाड्यातील संताचे महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान | डॉ.रत्ना लाला जवरास | ९४ |
| १६ | मराठवाड्यातील संतपरंपरा | रुपाली महेश रामशेट्टी | १०० |
| १७ | मराठवाड्यातील संत आणि समाज | कु. यादव नयना नारायण | १०६ |
| १८ | मराठवाड्यातील संत एकनाथ महाराज यांचे साहित्य विश्वातील योगदान | डॉ.सुनिता सकाहरी वडीतके | १११ |
| १९ | मराठवाड्यातील संत कवयित्रींच्या अभंग रचनेतील परखडपणा | प्रा. डॉ. मोरे संगीता दत्ताजी | ११६ |
| २० | मराठवाड्यातील संत परंपरा : एक अवलोकन | प्रा. महारूद्र जगताप | १२० |




Scanned with CamScanner



# मराठवाड्यातील संत परंपरा

डॉ. देविदास मल्हारी शेटे

## प्रस्तावना

महाराष्ट्र ही संतांची पवित्र व पावन भूमी आहे महाराष्ट्राला संतांची प्राचीन परंपरा आहे वारकरी पंथांच्या संतांनी समाजातील विषमतेवर आपल्या अभंगातून प्रहार केला संत ज्ञानेश्वर संत नामदेव यांनी वारकरी पंथाचा पाया रचला आणि संत तुकारामांनी यावर कळस चढविला म्हणूनच म्हटले जाते 'ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस! वारकरी पंथ हा महाराष्ट्रातील अत्यंत लोकप्रिय असा पंथ आहे वारकरी पंथातील संतानी मराठी भाषेत विपूल अशी ग्रंथसंपदा काव्यसंपदा निर्माण केली आहे या संप्रदायात सर्व जातिधर्माचे अनुयायी आहेत वारकरी पंथाचे दैवत पंढरीचा विठ्ठल आहे संत चोखामेळा संत सावतामाळी संत एकनाथ संत गोरा कुंभार संत नरहरी सोनार संत जनाबाई संत तुकाराम संत बहिणाबाई आदी विविध जाती धर्मातील संतांनी या पंथाचा प्रचार महाराष्ट्र व महाराष्ट्र बाहेर केला या संतांनी महाराष्ट्राला व मराठी भाषेला वाङ्मयाचा मोठा



Scanned with CamScanner

वारसा दिला आहे या भूमीत जन्म घेतलेल्या समाजाला संतांपासून संस्कार शाश्वत मूल्यांचा खजिना संस्कारक्षम शाश्वत मूल्यांचा खजिना मिळाला त्यामुळे संस्काराचा संपन्न वारसा या भूमीतील मराठी मनाला दिला त्यामुळे मराठी मनाचा कणा ताठ झाला महाराष्ट्रात संत परंपरेची मौक्तिकमाला आहे 'जगाच्या कल्याणा संताच्या विभूती।देह झिजवीती अपकारो।'हे संताचे मुख्य लक्षण संतांनी आपल्या आचरणातून मानवी मूल्यांचा केलेला विचार आदर्श आहे या आदर्शामुळे महाराष्ट्राच्या लोक जीवनावर उत्तम संस्कार झाले संतांनी मानवतावादाची गुढी उभारली माणुसकीला प्रतिष्ठा मिळवून दिली त्यामुळेच संत हे समाजापुढील आदर्श आहेत आणि म्हणूनच त्यांचं जीवन समजून घेण्याची ओढ प्रत्येक मनाला वाटते

**मराठवाड्यातील निवडक संत**

संत साहित्यामध्ये महाराष्ट्रातील अनेक विभागातील संतांचे योगदान आहे त्यामध्ये मराठवाडा हा आघाडीवर आहे मराठवाडयाच्या मातीत जन्माला आलेल्या अनेक संतांपैकी संत ज्ञानेश्वर संतमुक्ताबाई संतनिवृत्तीनाथ संत सोपान देव संत एकनाथ संत जनाबाई संत बहिणाबाई या संतानी मराठवाडयातच नव्हे तर मराठवाडयाच्या बाहेर जाऊन वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार करून जगाला विश्व कल्याणाचा मार्ग दाखवला त्यांनी निर्माण केलेले अभंग व गाथा आजही समाजाला दिशादर्शक ठरत आहेत "मराठवाडा ही महाराष्ट्राची ओळख आहे मराठवाडयात मराठी भाषेची निर्मिती झाली संत परंपरा याच भागाने जोपासली या भूमीमध्ये अनेक संत जन्माला आले आणि महाराष्ट्राला दिशा देण्याचे काम केले" (लोकमत बातमी-२०२१-औरंगाबाद)

**संत ज्ञानेश्वर**

संत ज्ञानेश्वर यांचा जन्म तेराव्या शतकात औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे वडील विठ्ठल पंत कुलकर्णी व त्यांच्या आई रुक्मिणीबाई यांच्या पोटी झाला संत ज्ञानेश्वर म्हणजे सुमारे साडेसातशे वर्षांपूर्वी महाराष्ट्राला पडलेलं सुंदर अध्यात्मिक स्वप्न!संत ज्ञानेश्वर म्हणजे परमार्थाच्या क्षेत्रातील 'न भूतो न भविष्यति'असे अजोड व्यक्तिमत्व अलौकिक काव्य प्रतिभा लाभलेले रससिद्ध महाकवी श्री संत निवृत्तीनाथ हेच संत ज्ञानेश्वरांचे सद्गुरू होते आपल्या गुरूच्या कृपाशीर्वादाने संत ज्ञानेश्वर यांनी अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा या ठिकाणी संस्कृत भगवद् गीतेवरचे रूपांतर प्राकृत भाषेमधून 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथामधे केले या ग्रंथास ज्ञानेश्वरी किंवा भावार्थ दीपिका असे म्हणतात ग्रंथराज ज्ञानेश्वरीत सुमारे ९००० ओव्या आहेत ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून संस्कृत भाषेतील 'ज्ञान' श्री संत ज्ञानेश्वरांनी प्राकृत भाषेत आणले

*माझा मराठाची बोलू कौतुके*
*परी अमृतातेही पैजासी जिंके*
*ऐसी अक्षरे रसिके मेळवीन ( ज्ञानेश्वरी-६ १४)*

असे म्हणत त्यांनी मराठी भाषेविषयीचा अभिमान मराठीची भाषेची महती व्यक्त केली आहे तसेच 'पसायदान' ही विश्वकल्याणाची प्रार्थना म्हणजे संत ज्ञानेश्वरांच्या वैश्विक सद्भावनेचा तसेच प्रतिभेचा प्रमुख साक्षात्कार आहे याशिवाय संत ज्ञानेश्वर यांनी 'अमृतानुभव' या ८२० ओवीसंख्या असणाऱ्या ग्रंथांमधून श्रेष्ठ तत्त्वज्ञान मांडले आहे तसेच संत ज्ञानेश्वर यांनी 'अमृतानुभव' या ८०० ओवीसंख्या असणाऱ्या ग्रंथांमधून श्रेष्ठ तत्त्वज्ञान मांडले आहे याबरोबरच 'चांगदेव पासष्टी' या ग्रंथामध्ये चांगदेवाचे गर्वहरण 'हरिपाठ' या २८ अभंगामधून हरिनामाचे महत्त्व सांगितले आहे पुढे संत ज्ञानेश्वर यांनी संत नामदेव यांच्याबरोबर तीर्थयात्रा करून वयाच्या अवघ्या २१ वर्षी आळंदी येथे इंद्रायणी नदीच्या पावन तीरावर संजीवन समाधी घेतली



Scanned with CamScanner

**संत ज्ञानेश्वर यांची भावंडे**

संत ज्ञानेश्वरांना इतर तीन भावंडे होते या भावंडांमध्ये श्री निवृत्तीनाथ हे त्यांचे जेष्ठ बंधू त्यांनी त्यांना गुरु मानले होते संत सोपानदेव संत मुक्ताबाई या सर्व भावंडांचे लहानपणीच आई-वडिलांचे छत्र हरवले होते त्यामुळे आपल्या तीन भावंडांसोबत मुक्ताबाई त्यांची मुक्ताई होऊन जगल्या चौदाशे वर्षे जिवंत राहून ज्ञान मिळवणाऱ्या चांगदेव महाराजांच्या गुरू झाल्या! त्यांनी 'ताटीचे अभंग' मधून संत ज्ञानेश्वरांना उपदेश केला आहे तासेच 'मुंगी उडाली आकाशी' व इतर रचना त्यांचा नावावर आहेत संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ सदानंद मोरे यांनी 'चार भावंडे' या चरित्रात्मक ग्रंथामध्ये चार अलौकिक संतांच्या कार्यकर्तृत्वाचा विस्तृत परिचय करून दिला आहे

**संत नामदेव**

संत नामदेव यांचा जन्म इ स १२७७ मध्ये सध्याच्या हिंगोली जिल्ह्यातील नरसी नामदेव येथे झाला त्यांच्या वडिलांचे नाव दामाशेटी तर आईचे नाव गोनाई होते शिंपी समाजात जन्माला आले तरी ते पारंपरिक व्यवसायात न रमता त्यांच्या कुटुंबात असलेल्या विठ्ठलभक्ती च्या वातावरनामुळे लहानपणापासूनच त्यांना विठ्ठल भक्तीची ओढ होती संत नामदेव हे २० वर्षाचे असताना संत ज्ञानेश्वर यांच्याशी त्यांची भेट झाली संत नामदेव यांना संत ज्ञानेश्वर समकालीन संत म्हणून त्यांना ओळखले जाते त्यांच्यावर ज्ञानेश्वराचा प्रभाव पडल्यामुळे ते ज्ञानेश्वरांचे एकनिष्ठ भक्त झाले आणि त्यांच्याबरोबर तीर्थयात्रेसाठी गेले संत नामदेव यांनी विसोबा खेचर यांच्याकडून गुरुउदेश घेतला त्यानंतर त्यांची विठ्ठल भक्ती सर्वव्यापक झाली संत नामदेव यांनी संत ज्ञानेश्वर यांच्या बरोबर तीर्थयात्रा करून आल्यानंतर ते पंजाब मध्ये गेले तिथे त्यांनी वारकरी संप्रदायाचा प्रचार व प्रसार केला त्यांनी पंजाब मध्ये वीस वर्ष वास्तव्य केले पंजाबमधील संत नामदेवाचे कार्य खुप महत्त्व... असल्यामुळे पंजाबच्या संत परंपरेत त्यांना ... संताचा मान मिळाला पंजाब मधील शिखांचा ... ग्रंथ 'गुरू ग्रंथ साहिब' यामध्ये त्यांची ६१ पदे ... संत नामदेव यांनी संत ज्ञानेश्वर यांच्या समाधीचा ... केला व त्यांचे चरित्र आधी समाधी व तीर्थ... या तीन विभागात लिहिले याशिवाय त्यांनी ... नामदेवाची अभंग गाथा' यामधून त्यांचे ... अभंग प्रसिद्ध आहेत संत ज्ञानेश्वरानंतर वार... संप्रदायाच्या प्रचार व प्रसार त्यांनी ५० वर्षे केला ... शिरोमणी' असे यथार्थ संबोधन त्यांच्याबद्दल वाप... जाते भगवद्भक्तांच्या व साधु-संतांच्या चरण धू... स्पर्श व्हावा म्हणून पंढरपूर येथील विठ्ठल मंदिरा... महाद्वारी 'पायरीचा दगड' होण्यात त्यांनी धन्य... मानली

**संत जनाबाई**

१२ व्या शतकातील संत जनाबाई या मूळ परभ... गंगाखेडच्या संत जनाबाई यांच्या बालपणीचा इति... पाहिला तर संत जनाबाईला त्यांच्या आईवडि... लहानपणी वयाच्या सातव्या-आठव्यावर्षी नामदे... वडील दामाशेट शिंपी यांच्याकडे कामासाठी पा... संत नामदेवांच्या घरी राहून त्याच्या कुटुंबीयांतील ... घटक बनल्या त्या स्वतःला 'नामयाची दासी' म्हण... घेत असत संत जनाई विठ्ठल भक्त काम करत करत ... विठ्ठलाचे नामस्मरण करत त्यांचे अभंग साक्षात वि... माऊलीने लिहिण्याचे उल्लेख संत साहित्यात आ... इतिहासात सापडतात जनाई संत नामदेवाच्या ... राहत असल्या तरी गावातील तथाकथित लोकां... त्यांना हालउपेक्षा सोसावी लागली जनाईचा ... विठ्ठलाचा काय संबंध म्हणून त्यांना प्रश्न केला ... या प्रश्नाला जनाईने त्यांच्या अभंगांतून उत्तर दिले ...

*जनाई म्हणते 'देव खाते देव पीते ।*

*देवावरी मी निजतें ॥१॥*

*देव देते देव घेते।देवासवें व्यवहारिते ॥२॥*
*देव येथें देव तेथें।देवाविणें नाहीं रीतें ॥३॥*
*जनी म्हणे विठाबाई।भरुनि उरलें अंतरबाहीं ॥४॥*

बाराव्या शतकात इतक्या परखडपणे संत जनाईने तथाकथित लोकांना त्यांच्या अभंगांतून समज दिली आहे संत जनाबाई या वारकरी चळवळीतील अत्यंत बंडखोर स्त्री संत म्हणून ओळखल्या जातात

संत एकनाथ यांचा जन्म इ स १५३३ मध्ये पैठण येथे झाला संत भानुदास हे एकनाथांचे पणजोबा संत एकनाथांच्या वडिलांचे नाव सूर्यनारायण होते आईचे नाव रुक्मिणी होते आई-वडिलांचा सहवास त्यांना फार काळ लाभला नाही एकनाथांचे गुरू जनार्दनस्वामी हे होते

संत ज्ञानेश्वरांच्या नंतर सुमारे २५० वर्षांनी एकनाथांचा जन्म झाला 'बये दार उघड' असे म्हणत नाथांनी अभंगरचना भारूड जोगवा गवळणी गोंधळ यांच्या साहाय्याने जनजागृती केली एकनाथ हे संतकवी पंतकवीवतंतकवीहोते त्यांनी आपल्या साहित्याद्वारे जनतेचे रंजन व प्रबोधन केले 'एका जनार्दन' म्हणून स्वतःचा उल्लेख करतात एका जनार्दनी ही त्यांची नाममुद्रा आहे 'एकनाथी भागवत हा त्यांचा लोकप्रिय ग्रंथ आहे ही एकादश स्कंदावरील टीका आहे मुळात एकूण १३६७ श्लोक आहेत परंतु त्यावर भाष्य म्हणून १८ ८१० ओव्या संत एकनाथांनी लिहिल्या आहेत व्यासांनी रचलेले मूळ भागवत १२ स्कंदांचे आहे नाथांनी लिहिलेल्या भावार्थ रामायणाच्या सुमारे ४० हजार ओव्या आहेत रुक्मिणीस्वयंवर हेही काव्य त्यांनींच लिहिले आहे सर्वांत महत्त्वाचे म्हणजे एकनाथांनी ज्ञानेश्वरांनच्या समाधीचा उद्धार केला ते दत्तभक्त होते देवीभक्त पण होते जातिभेद दूर करण्यासाठी यांनी आयुष्यभर प्रयत्न केले याबरोबरच त्यांनी भावार्थ रामायण अभंग गवळणी व भारुड यांची रचना केली ते खरे लोकशिक्षणकार होते भारुडाच्या माध्यमातून त्यांनी मराठवाड्यातील व महाराष्ट्रातील लोकांच्या प्रबोधनाचे महत्त्वाचे काम केले

**संत बहिणाबाई**

संत बहिणाबाई यांचा जन्म गोदावरीच्या उत्तरेस कन्नड तालुक्यातील वेळगंगा नदीच्या काठी देवगाव (रंगाऱ्याचे) येथे शके १५५१ मध्ये झाला संत बहिणाबाईंना विठ्ठल भक्तीचे वेड होते संत तुकारामांचे कीर्तन ऐकून त्यांनी तुकोबांना आपले गुरू मानले होते पण एका ब्राम्हण स्त्रीने शूद्र कुणबी असणाऱ्या संत तुकारामांचे शिष्यत्व पत्करावे ही गोष्ट त्या काळातील मंबाजीसारख्या तत्कालीन स्वयंघोषित धर्मपंडितांना पचनी पडणारी नव्हती यामुळे मंबाजीने त्यांचा खूप छळ केला पण त्यांनी आपली तुकोबांविषयीची दृढ निष्ठा आणि भक्ती सोडली नाही त्यामुळे त्यांना अनेक वेळा पतीचा रोष मारहाणही सहन करावी लागली संत बहिणाबाई आपल्या गुरूंचा उल्लेख पदोपदी आपल्या अभंगांत करताना दिसतात बहिणाबाई म्हणतात

**तुका सद्‌गुरू सदोहर भेटतो अपार सुख होवो**

मराठवाड्यातील या संत महिलांनी केलेले कार्य आजच्या काळातही जसेच्या तसे लागू होते आजच्या काळात स्त्री जेव्हा एकटीने काही करू पाहते तेव्हा तिला दूषणे दिली जातात संसार करून परमार्थचा मार्गावर चालताना आपला गुरू कोण असावा किंवा आपण ज्यांना गुरू मानतो त्यांचे शिष्यत्व घेताना धीराने अडचणीवर मात करत संत बहिणाबाई भक्तिमार्गात लीन होतात

याबरोबरच याच मराठवाडयामध्ये महानुभाव पंथाची स्थापना महात्मा चक्रधर यांनी केली संत मुक्तेश्वर संत दासोपंत संत गोरोबाकाका संत गोरा कुंभार संत शिरोमणी चोखामेळा संत जनार्दन स्वामी समर्थ संप्रदायाचे रामदास स्वामी हेही याच भूमीत जन्मले आहेत मराठी भाषेतील आद्य संत कवयित्री



Scanned with CamScanner

महदंबा यांचाही जन्म याच मराठवाडयात झाला आहे

महाराष्ट्र ही संतांची कर्मभूमी म्हणून ओळखली जाते या कर्मभूमीतील संतांनी महाराष्ट्राच्या विविध प्रदेशात जन्म घेऊन संत ज्ञानेश्वर यांनी स्थापन केलेल्या वारकरी संप्रदायाच्या छत्राखाली येऊन वैश्विक मूल्यांची प्रतिष्ठापना केली आणि माणुसकी धर्माची गुडी उभारणी गेली शेकडो वर्षापासून याच संतांच्या शिकवणीचे आजपर्यंत पालन होत आहे काळ बदलला माणसे बदलली आधुनिकता आली तरीही संतांनी दिलेली शिकवण आज पर्यंत टिकून आहे टिकून आहे या संतांनी मराठी साहित्याला अभंग भारूड गवळणी चरित्र आत्मचरित्र अशा अनेक प्रकारचे साहित्य प्रकार दिले मराठवाडयात जन्म झाला असला तरी मराठवाड्यातील संतांचे कार्य मराठवाड्या पुरते मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्र व महाराष्ट्र बाहेरही त्याचा प्रचार व प्रसार त्यांनी केला 'भक्ती' हा प्रधान येतो संतांच्या शिकवणीचा असला तरी प्रपंच करून परमार्थाची शिकवण संतांनी जन माणसाला दिली आणि यामुळे सर्वसामान्य माणसानेही भागवत पताका उंच उंच फडकवत ठेवली आहे एक आत्मविश्वास सर्वसामान्य माणसाला त्यांनी दिला त्यांच्या अभंगामधून सर्वसामान्य माणसाला आपल्या जीवनात आनंद शोधता आला आणि त्याचे जीवनही समृद्ध झाले ते संतांच्या शिकवणीतूनच हे वास्तव सत्य आज आपल्याला नाकारून चालणार नाही


१) श्री सकलसंतवाणी-( मराठी) खंड-२ गीता प्रेस गोरखपूर

२) 'वारकरी संतांचा भक्तियोग'- अभ्यंकर वासुदेव शंकर आदित्य प्रकाशन पुणे

३) 'महाराष्ट्रातील संत परंपरा'-डॉ आरती दातार

४) 'महाराष्ट्रातील संत परंपरा'- डॉ अभिषेक ठमके

५) 'संत एकनाथ गाथा'-( संपादक) नाना महाराज साखरे

६) 'चार भावंडे'- संतदर्शन - चरित्रग्रंथ संच डॉ सदानंद मोरे

७) 'संत तुकारामांचा शिष्य परिवार'- डॉ शोभा घोलप प्रतिमा प्रकाशन पुणे

८) 'संत वांग्मयाची सामाजिक फलश्रृती'- ग ब सरदार लोकमान्य गृह मुंबई



- डॉ. देविदास मल्हारी शेटे

सावित्रीबाई कला महाविद्यालय

पिंपळगाव पिसा श्रीगोंदा अहमदनगर

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे




Scanned with CamScanner